व्यंकटेश महाविद्यालयात उद्योजकतेवर कार्यशाळा संपन्न

"व्यंकटेश महाविद्यालयाच्या बीबीए विभागाच्या वतीने 'एन्ट्रेपेनरशीप अँड फ्युचर प्रोस्पेक्ट्स इन लीगल प्रोफेशन' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सदर चर्चासत्रामध्ये अँडव्हॉकेट डॉ. अंजली पाटील, संजय घोडावत युनिव्हर्सिटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांची ओळख कॉलेजच्या बीबीए विभागाचे कॉर्डिनेटर प्राध्यापक यू. बी .नदाफ यांनी करून दिली. तसेच प्रमुख पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर बी. एन. कांबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. सदर कार्यक्रमात यांनी फ्युचर प्रोस्पेक्ट इन लीगल प्रोफेशन म्हणजेच कायदेशीर व्यवसायात भविष्यातील शक्यता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच एन्ट्रेपेनरशीप या विषयात प्रोफेसर अर्जुन पाटील संजय घोडावत युनिव्हर्सिटी यांनी उद्योजकतेसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्याबद्दल विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. मिस खुशी पारीक संजय घोडावत युनिव्हर्सिटी यांनी अवेअरनेस इन एंट्रन्स एक्झाम म्हणजे स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी जसे सीईटी याविषयी मुलांना योग्य ती माहिती व मार्गदर्शन केले. व शेवटी स्नेहा पारीक या विद्यार्थिनी ने आभार प्रदर्शनाचे काम केले. सदर कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थिनी व बीबीए डिपार्टमेंटचे प्राध्यापक इत्यादीमोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


NAAC
02-2025